**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शुक्रवार दिनांक ७ मार्च २०२५**

**ठळक बातम्या**

1. चालू आर्थिक वर्षात राज्याचा आर्थिक विकास दर ७ पूर्णांक ३ दशांश टक्के राहण्याची शक्यता आर्थिक पाहणी अहवालात व्यक्त.

2. नागपूरच्या मिहान येथील पतंजली मेगा फूड अँड हर्बल पार्क' प्रकल्पाच उदघाटन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते रविवार, ९ मार्च रोजी.

3. नागपूर जिल्ह्यातील पारशिवनी तालुक्यात उपजिल्हा रुग्णालयाची तातडीची गरज - विधान परिषदेत आमदार डॉ. परिणय फुके यांची मागणी.

4. जागतिक महिला दिनानिमित्त राज्यातल्या प्रत्येक ग्रामपंचायतीत विशेष ग्राम सभा, नागपुरात विविध संस्थांतर्फे बहुविध कार्यक्रम .

-------------------------------------------

**आर्थिक पाहणी अहवाल**

चालू आर्थिक वर्षात राज्याचा आर्थिक विकास दर ७ पूर्णांक ३ दशांश टक्के राहण्याची शक्यता आहे. कृषी आणि निगडीत क्षेत्र ८ पूर्णांक ७ दशांश, सेवा क्षेत्र ७ पूर्णांक ८ दशांश आणि उद्योग क्षेत्र ४ पूर्णांक ९ दशांश टक्क्यांनी वाढण्याची शक्यता राज्याच्या आर्थिक पाहणी अहवालात वर्तवली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत आज हा अहवाल मांडला. या आर्थिक वर्षात राज्याचे स्थूल उत्पन्न ४५ लाख ३१ हजार ५१८ कोटी रुपये राहण्याची शक्यता आहे. तर दरडोई उत्पन्न २ लाख ७८ हजार ६८१ रुपयांवरून ११ टक्क्यांनी वाढून ३ लाख ९ हजार ३४० रुपये होण्याचा अंदाज आहे. स्थूल उत्पन्नाचा विचार करता महाराष्ट्र देशात पहिल्या क्रमांकावर असेल. मात्र दरडोई उत्पन्नामध्ये तेलंगणा, कर्नाटक, तमिळनाडू यांच्यानंतर राज्याचा क्रमांक लागतो. गेल्या आर्थिक वर्षात राज्याचे महसुली उत्पन्न ४ कोटी ८६ लाख ११६ कोटी रुपये होते. यंदा ते केवळ १३ हजार कोटींनी वाढून सुमारे ५ लाख कोटी रुपये होईल, असा अंदाज या अहवालात वर्तवला आहे.

गेल्यावर्षी ५ लाख ५ हजार ६४७ कोटी रुपये असलेला महसूली खर्च यंदा ५ लाख १९ हजार ५१४ कोटी होण्याची शक्यता आहे. २०२४-२५ या आर्थिक वर्षात राज्याची राजकोषीय तूट २ पूर्णांक ४ दशांश टक्के आणि महसुली तूट ४ दशांश टक्के असेल, असा राज्य सरकारचा अंदाज आहे.

-------------------------------------------

प्रधानमंत्री मोफत सूर्यघर

प्रधानमंत्री मोफत सूर्यघर योजनेच्या धर्तीवर राज्य सरकार नवी योजना आणणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केली. राज्यपालांच्या अभिभाषणावरच्या चर्चेला उत्तर देताना ते विधानसभेत बोलत होते. या योजनेच्या अंतर्गत शंभर युनिट पर्यंत वीज वापरणाऱ्या दीड कोटी ग्राहकांना घराच्या छतावर सौर पॅनल बसवता येतील आणि त्यातून त्यांना मोफत वीज मिळेल. स्मार्ट मीटर लावणाऱ्या घरगुती ग्राहकांनी दिवसा वापरलेल्या वीजेवर सवलत देणार असल्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी सभागृहात केली.

*(विकसित भारत याच्या अंतर्गत आपण एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आणि आपण असं ठरवलं की 2030 सालापर्यंत महाराष्ट्रामध्ये मध्ये आपण जी काही ऊर्जा वापरतो त्यातली किमान 50 टक्के ऊर्जा ही अपारंपरिक ऊर्जा स्रोतातंन आली पाहिजे आज ती मागच्या वर्षीपर्यंत केवळ 13 टक्के होते. पुढच्या वर्षी 25 टक्के होईल. मला सांगताना आनंद वाटतो. हाती घेतलेले प्रकल्प किंवा सुरू झालेले प्रकल्प जे 2030 सालापर्यंत पूर्ण होणार आहे ते पूर्ण झाल्यानंतर 2030 साली.महाराष्ट्रामध्ये 52 टक्के वीज ही अपारंपरिक ऊर्जा स्रोतां या ठिकाणी निर्मित होईल)*

राज्यात १५ लाख ७० हजार कोटींचे गुंतवणूक करार करण्यात आले. यात उद्योग विभागानं ११ लाख ७१ हजार कोटी, MMRDA ने ३ लाख ४४ कोटी, सिडकोने ५५ हजार दोनशे कोटी रुपयांचे करार केल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

-------------------------------------------

पुरवणी मागण्या

विधानपरिषदेत आज २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या सहा हजार ४८६ कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या चर्चेनंतर मंजूर करण्यात आल्या.या चर्चेत बोलताना विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी, खर्च आणि उत्पन्नाचा योग्य ताळमेळ नसल्यामुळे राज्य सरकारच्या तिजोरीत खडखडाट असल्याची टीका केली. या मागण्यांमध्ये कौशल्य विकास विभागाकडे राज्य सरकारनं दुर्लक्ष केल्याची टीकाही त्यांनी केली. राज्यात अनेक विभागाच्या मागण्या असूनही त्यांना निधी मिळाला नाही तर, काही

विभागांकडे निधी असूनही तो खर्च करण्यात आला नाही, याकडे दानवे लक्ष वेधलं. दरम्यान शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अनिल परब यांनी राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेदरम्यान स्वतःची तुलना छत्रपती संभाजी महाराजांशी केल्याचा आणि राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य केल्याचा आरोप करत विधान परिषदेत आज सत्ताधारी आक्रमक झाले. दोन्ही बाजूंनी झालेल्या शाब्दिक खडाजंगीमुळे कामकाज तीनदा तहकूब करावं लागलं.

------------------------------------------

पतंजली

नागपूरच्या मिहान येथील विशेष आर्थिक क्षेत्रामध्ये'पतंजली मेगा फूड अँड हर्बल पार्क' याअन्न प्रक्रिया प्रकल्पाच उद्घाटन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते रविवार, ९ मार्च रोजी होणार असून पतंजलीने उभारलेला ' हा आशियातील सर्वात मोठा संत्रा प्रक्रिया प्रकल्प असेल. अशी माहिती पतंजली आयुर्वेद लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक आचार्य बाळकृष्ण यांनी आज पत्रकार परिषदेत दिली .

*(भव्य उद्घाटन परसों यानी संडे 9 मार्च को माननीय मुख्यमंत्री जी और आदरणीय गडकरी जी के साथ होने जा रहा है। उनके सानिध्य में परम पूज्य स्वामी जी महाराज जी यहाँ पर पहुँचेंगे। ये वर्षों से हमारी प्रतीक्षा थी और विशेषकर करके मैं एक बात हमेशा कहता हूँ लेट हुआ।थोड़ी देर हुई पर हम अभी उस भव्यता के साथ में उसको अब यहाँ पर शुरू करने जा रहे हैं।)*

सदर प्लांटची प्रक्रिया क्षमता दररोज ८०० टन आहे. ज्यामध्ये अ ग्रेड व्यतिरिक्त, ब आणि क ग्रेड संत्री, अकाली परिपक्व झालेले उत्पादन आणि वादळामुळे गळून पडलेल्या संत्र्यांवर देखील प्रक्रिया केली जाणार असल्याची माहिती त्यांनी दिली. संत्र्याच्या सालीपासून वाष्पशील आणि सुगंधी तेल काढण्यासोबतच संत्र्यांच्या इतर बाय प्रोडक्ट्स वर सुद्धा हा प्रकल्प काम करील असे त्यांनी सांगितलं या प्रकल्पामुळे विदर्भातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना लाभ मिळणार असल्याचा त्यांनी सांगितलं

*(कृषियों के कृषकों के जीवन में खुशहाली और प्रसन्नता को लाने के लिए विशेष बात यह है कि यह संतरे का जो प्लांट है, यह एशिया का सबसे बड़ा और सबसे अडवांस प्लांट है)*

कच्च्या मालाच्या उपलब्धतेनुसार, संत्रा, लिंबू, आवळा, डाळिंब, पेरू, द्राक्षे, भोपळा, गाजराचा रस, आंबा आणि संत्र्याचा गर आणि कांदा आणि टोमॅटोची पेस्ट देखील येथे बनवली जाईल, असेही त्यांनी सांगितले.

---

**डॉ. परिणय फुके**

नागपूर जिल्हयातील पारशिवनी तालुक्यात उपजिल्हा रुग्णालयाची तातडीची गरज लक्षात घेता, विधान परिषदेत आमदार डॉ. परिणय फुके यांनी हा मुद्दा उपस्थित केला. या भागातील नागरिकांना आधुनिक आणि तातडीच्या आरोग्य सेवांसाठी मोठ्या प्रमाणावर नागपूर किंवा इतर ठिकाणी जावे लागते. त्यामुळे पारशिवनीला उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा मिळावा, अशी मागणी त्यांनी सभागृहात केली.

---

**इंदुमिल**

इंदुमिल मधील डॉ बाबासाहेबांच्या स्मारकाचे काम ८० % पूर्ण झाले आहे त्यासाठी खर्च १ हजार ९० कोटी झालाय ,डॉ बाबासाहेबांचा पुतळा हा देशात दुसऱ्या क्रमांकाचा उंच पुतळा असणार आहे त्याची ऊंची ४५० फुटपर्यंत असणार आहे .हे स्मारक तयार व्हायला अजून दीड वर्ष तरी लागेल अशी माहिती केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी दिली. -

*(बाकीचे जे काम झाले ते पूर्ण कॉल आलेला आहे, परंतु जो पुतळा आहे त्या पुतळाचे जे काही अनेक लोकांनी शंका कुशंका घेतल्या होत्या . अनेक लोक दिल्लीला जाऊन बघून आली. आम्ही बघून आलो आणि सगळे टेक्निकल स्टाफने सगळे बघितलेला आहे आणि तो पुतळाचे ऑर्डर देण्यामध्ये थोडं उशीर लागलेला आहे. यामुळे आता काम राम सुतार आणि अनिल सुतारकर यांचे आहे.पण ते काम पूर्ण होण्यासाठी अजून एक दीड वर्षाचा कालावधी लागेल असे त्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे थोडा वेळ जरी लागला तरी .हरकत नाही पण मार्ग मजबूत झाली पाहिजे. चांगलं चाललं पाहिजे आणि जगामध्ये चर्चेला जाईल अशा पद्धतीचे स्मार्ट होणार आहे..)*

---

**महिला दिन**

जागतिक महिला दिनानिमित्त राज्यातल्या प्रत्येक ग्रामपंचायतीत विशेष ग्राम सभा आयोजित करण्यात येणार आहेत, अशी माहिती महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली आहे. महिलांच्या हक्कांसाठी व्यापक लोकचळवळ उभी रहावी, महिलांचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रभावी धोरणं गावपातळीवर अंमलात यावीत आणि महिलांच्या सुरक्षेसाठी ठोस उपाययोजना राबविल्या जाव्यात, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.नागपूरच्या सिटीझन फोरम ऑफ इक्वलिटी तर्फे उद्या जागतिक महिला दिन साजरा करण्यात येणार असून या कार्यक्रमाला पोलीस

आयुक्त रवींद्र सिंगल समाजसेविका लीलाताई चितळे आणि ज्येष्ठ पत्रकार प्रदीप मैत्र यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे हा कार्यक्रम उद्या दुपारी बारा वाजता पोलीस भवन कॉन्फरन्स हॉल सिविल लाईन्स संपन्न होणार आहे.नागपूर श्रमिक पत्रकार संघ, टिळक पत्रकार भवन ट्रस्ट व नागपूर प्रेस क्लबच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनानिमित्त नागपुरातील महिला पत्रकारांना उद्या सन्मानित करण्यात येणार आहे.ज्येष्ठ संपादक एस.एन. विनोद यांच्या पत्नी शोभा विनोद यांच्या स्मृतीप्रित्यर्थ दिला जाणारा, 'जर्नलिस्ट ऑफ द इयर' हा पुरस्कार यंदा हितवादमधील डेप्युटी एडिटर आसावरी शेणोलीकर यांना प्रदान केला जाणार आहे. भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालय अंतर्गत येणाऱ्या नागपूर इथल्या दक्षिण-मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्रातर्फे, ८ मार्च ते १० मार्च २०२५ दरम्यान, "आंतरराष्ट्रीय महिला दिना" निमित्त "स्त्री महोत्सव" आयोजित केला जात आहे. उद्या ८ मार्च रोजी सायंकाळी ६.३० वाजता महाराष्ट्रातील प्रसिद्ध लोककला "भारुड" सादर केली जाईल.

---------------------------------------------